Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(A)| February - 2026

Original Article

# भारतीय राज्यघटना आणि सामाजिक न्याय

**डॉ.पिनाटे किरण प्रल्हादराव**
लोकप्रशासन विभाग प्रमुख, कै.सौ.शेषाबाई सिताराम मुंढे
कला महाविद्यालय , गंगाखेड. जि .परभणी
**Email:** pinatekiran@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180245
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(A)
Pp. 227-230
February - 2026
**Submitted:** 19 Jan. 2026
**Revised:** 29 Jan. 2026
**Accepted:** 14 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***सारांश***

*भारतात सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी झाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे, महात्मा फुले ,आगरकर, शाहू महाराज, महात्मा गांधी इत्यादींनी समाज प्रबोधनाचे कार्य केले. भारत सरकारने कल्याणकारी राज्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आर्थिक ,सामाजिक, राजकीय न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला . समाजाच्या संकल्पनेइतकीच न्यायाची संकल्पना जुनी आहे. समाजामध्ये प्रत्येक व्यक्ती आपल्या विकास करू इच्छितो. नागरिकाला उपजीविकेची साधने ,विकासाची संधी मिळवून देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असते. आर्थिक ,सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी सरकारने विविध स्वरूपाचे कायदे संमत करून त्यांची अंमलबजावणी केली. उदा.कुळ कायदे ,जमीन सुधारणा विषयक कायदे, जमीनदारी पद्धत निर्मूलनासाठी केलेले कायदे इत्यादी प्रकारचे कायदे करून आर्थिक समता निर्माण करण्याचा प्रयत्न शासनाने केला . राजकीय क्षेत्रात पंचायतराज व्यवस्था स्वीकारून सत्तेचे विकेंद्रीकरण केले. समाजातील सर्वच घटकांना प्राधान्य देण्याच्या हेतूने 73वी व 74 वी घटना दुरुस्ती करून एक प्रकारे राजकीय न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न शासनाकडून झाला. तसेच मूलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्वांच्या आधारे सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो.*

***मुख्य शब्द:-*** *भारतीय राज्यघटना, सामाजिक न्याय, मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्वे ,समता ,लोकशाही, राजकीय न्याय , विकास, समाज सुधारणा.*

## प्रस्तावना

राज्यघटनेद्वारा प्रातिनिधीक व संसदीय लोकशाहीचा स्वीकार करण्यात आला आहे. लोक व त्यांचे प्रतिनिधी यांच्यातील जबाबदारीचे नाते हा लोकशाही व्यवस्थेचा मुलाधार आहे. म्हणजे लोकांना आपला प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार आहे. तर प्रतिनिधींनी लोकांच्या हिताची जपणूक करावे असे गृहीतक आहे.अशा प्रकारे सरनामा लोकांचे , लोकांद्वारे व लोकांसाठी चालवल्या जाणाऱ्या लोकशाही शासनाचा निर्देश करतो. त्यासाठी सार्वत्रिक प्रौढ मताधिकार, व्यक्ती स्वातंत्र्य, स्वतंत्र न्यायव्यवस्था ,मुक्त प्रसार माध्यमे ही साधने पुरविली आहेत. महत्वाची बाब म्हणजे भारतीय लोकशाही केवळ राजकीय जीवनापुरतीच मर्यादित नसावी तर सामाजिक व आर्थिक जीवनातही लागू केली जावी अशी अपेक्षा संविधानकर्त्यांना होती. म्हणूनच भारतीय संविधानांच्या प्रास्ताविकेत भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष ,लोकशाही गणराज्याचा उल्लेख आहे. सोबतच विचार, अभिव्यक्ती, विश्वास,श्रद्धा व उपासनेचे स्वातंत्र्य, दर्जा व संधीची समानता, बंधुता तसेच राजकीय, आर्थिक व सामाजिक न्यायाचा स्पष्ट उल्लेख आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ.पिनाटे किरण प्रल्हादराव, लोकप्रशासन विभाग प्रमुख, कै.सौ.शेषाबाई सिताराम मुंढे कला महाविद्यालय , गंगाखेड. जि .परभणी*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18949969
OPEN ACCESS

**How to cite this article:**
*पिनाटे, . किरण . प्रल्हादराव . (2026). भारतीय राज्यघटना आणि सामाजिक न्याय. Journal of Research & Development, 18(2(A)), 227–230.* https://doi.org/10.5281/zenodo.18949969

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(A)| February - 2026

भारताच्या राज्यघटनेत मानवी प्रतिष्ठेविषयी सन्मान, समतेच्या तत्वांशी बांधिलकी आणि दुर्बल घटकाविषयी कळकळ या तीन गोष्टी प्रखरतेने प्रतिबिंबित होतात. या तिन्ही बद्दलचे विवेचन राज्यघटनेच्या भाग दोन मध्ये मूलभूत अधिकार आणि भाग चार मध्ये राज्य धोरणाची निर्देशक तत्वे या दोन भागातून दिसतात.

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याद्वारे भारतीय समाजात सामाजिक ,राजकीय आणि आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. न्याय म्हणजे समाजातील विषमता ,शोषण, मनमानी स्वरूपाचा भेदभाव, यांचे उच्चाटन करून सर्व व्यक्तींना सत्ता ,प्रतिष्ठा व संपत्ती यांच्या समान वाटपाची हमी देणारी व्यवस्था होय. या व्यवस्थेत स्वातंत्र्य,समता व बंधूता तत्त्वत्रयीचा सुवर्णमध्य साधला जाईल .थोडक्यात न्याय समाजावर आधारित न्याय राज्याची हमी देणे हे या मागील ध्येय आहे. अर्थात हा न्याय मानवी जीवनाच्या राजकीय जीवनासह सामाजिक व आर्थिक जीवनातही अवतरेल याची हमी देणे महत्त्वाचे ठरते. भारतात परंपरेने काही घटकांना वर्ण ,जात, वंश ,लिंगभाव या आधारावर सत्ता, संपत्ती,व प्रतिष्ठा या गोष्टीपासून दूर ठेवले. प्राथमिक गरजा आणि मानवी दर्जा यापासून वंचित ठेवले. अशा समूहाच्या कल्याणासाठी विशेष उपाययोजना केल्या पाहिजेत ,या जाणीवेतून भारतात सामाजिक न्यायाची संकल्पना उदयास आली.

**सामाजिक न्यायाची संकल्पना**

**सामाजिक न्याय**:- सामाजिक न्यायाची संकल्पना ही लोकशाही, समाजवादी आणि कल्याणकारी राज्यामुळे निर्माण झाली आहे .सामाजिक न्यायाच्या संकल्पनेत “समाज ”आणि “ न्याय” हे दोन शब्द आहेत ,म्हणून या संकल्पनेचा संबंध समजाला न्याय देण्याशी आहे. समाजात व्यक्ती - व्यक्तीमध्ये असणारी असमानता, अन्याय ,शोषण नष्ट करणे व सहयोगाची भावना, मानवी प्रतिष्ठा निर्माण करणे ,व्यक्ति महत्त्वाची असते ही मानसिकता निर्माण करणे म्हणजे" सामाजिक न्याय" होय. समाजातील अनेक घटकांशी संबंधित असणारी ही संकल्पना आहे.

सामाजिक न्याय हा न्यायाचा एक प्रकार आहे. आधुनिक काळात सामाजिक न्याय संकल्पनेला महत्त्व प्राप्त झाले आहे. व्यक्ती व्यक्ती मध्ये जात, धर्म, वंश,पंथ,वर्ण ,जन्मस्थान, लिंगभाव या सामाजिक आधारावर भेदभाव न मानता प्रत्येक व्यक्तीला विकासाची संधी उपलब्ध करून देणे म्हणजे सामाजिक न्याय होय. सामाजिक न्याय ही संकल्पना व्यक्तीचा सन्मान, प्रतिष्ठा आणि बंधुभाव यावर आधारलेली आहे. सामाजिक न्याय हे तत्व गरीब, मागास,वंचित ,निराश्रित,विकलांग ,अल्पसंख्यांक, असमर्थ अशा तळागाळातील लोकांच्या हिताचे संरक्षण करणारे तत्व आहे . सामाजिक न्याय ही संकल्पना धार्मिक सहिष्णुता आणि सामाजिक सौहार्द यांचे समर्थन करते. सामाजिक न्याय ही सातत्यपूर्ण चालणारी प्रक्रिया आहे. ज्यामध्ये समाजातील असमर्थ ,दुर्बल ,असहाय्य व वाताहात झालेल्या लोकांच्या प्रति आदर ,सन्मान, समानता ,बंधुतेचा भाव अभिव्यक्त केला जातो .त्यांच्या उन्नती आणि विकासासाठी सर्वोत्तम पर्याप्त मार्गाचा अंगीकार केला जातो. सामाजिक न्यायामध्ये नैतिक तत्वे आणि वैधानिक तरतुदी यांची जोड बांधणी करणारी योजना आखली जाते ,त्यामुळे व्यक्ती व्यक्ती मधील राजकीय, आर्थिक ,धार्मिक नैतिक इत्यादी प्रकारचे सहसंबंध स्थापित केले जातील.

अतिशय प्राचीन काळापासून ही संकल्पना अस्तित्वात आहे. कारण राज्य सरकार ,समाज, धर्म या संस्थां न्यायासाठीच निर्माण करण्यात आलेल्या आहेत . न्याय यास इंग्रजीत Justice असे म्हटले जाते. जस्टिस या शब्दाची उत्पत्ती लॅटिन भाषेतील Jus या शब्दापासून झाली आहे. Jus या शब्दाचा अर्थ जोडणे किंवा संयोजित करणे होय. व्यक्तीला परस्परांशी जोडणे किंवा एकीकृत करणे म्हणजे सामाजिक न्याय होय. राज्य हा उद्देश प्रशासनामार्फत साध्ये करते . प्लेटोच्या मते न्याय म्हणजे प्रत्येक व्यक्तीचा त्याच्या स्वाभाविक गुणानुसार विकास होऊ देणे व सामाजिक स्थिती त्यास अनुकूल बनवणे होय. न्याय संकल्पनेला अर्थपूर्ण आशय प्राप्त करून देणारे तत्त्व म्हणून सामाजिक न्यायाची मांडणी केली जाते. समतेला केंद्रबिंदू मानून न्यायाची मांडणी करणारा विचार म्हणजे सामाजिक न्याय होय.समाजाने निर्माण केलेला कोणताही कृत्रिम भेदभाव दूर करून समाजातील संसाधनांचे नैतिकदृष्ट्या समर्थनीय ठरेल असे वितरण करणे म्हणजे सामाजिक न्याय होय .व्यापक अर्थाने सामाजिक न्याय या संज्ञेतून "सामाजिक, आर्थिक राजकीय ",तिन्ही प्रकारच्या न्याय तत्वांचा अर्थ व्यक्त होतो. मात्र केवळ सामाजिक न्याय या शब्दावलीचा अर्थ पाहिला तर समाज जीवनामध्ये सर्व स्त्री -पुरूषांची व्यक्तीत प्रतिष्ठा मानने , कोणत्याही दोन व्यक्तींमध्ये कोणत्याही आधारावर भेदभाव न करणे ,संधीची समानता असणे, दुर्बल आणि निर्धन घटकांना घटनात्मक संरक्षण, आणि विशेष सहाय्यता देणे इत्यादी बाबींचा यामध्ये समावेश होतो. सामाजिक न्यायामध्ये राज्यसंस्थेने समाजात समतलनाची प्रक्रिया राबविणे अपेक्षित असते.

**साधारणता सामाजिक न्यायात खालील बाबींचा विचार केला जातो.**

1. व्यक्ती स्वातंत्र्याबरोबरच सामाजिक हितही महत्त्वाचे मानले जाते.
2. मानवी प्रतिष्ठा,त्याचा गौरव तसेच त्याच्या अधिकारांचे रक्षण केले जाते .
3.लोकशाही, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि कल्याणकारी राज्यात सामाजिक न्यायाचा प्राधान्याने विचार केला जातो.

4 . जन्मतः च सर्व व्यक्ती समान मानल्या जातात .सर्व व्यक्तीना सारखीच प्रतिष्ठा दिली जाते .कोणत्याही व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीचे साधन मानले जात नाही.

5. जात ,धर्म, वंश, लिंग ,रंग ,संपत्ती यांच्या आधारे व्यक्ती व्यक्तीत भेदभाव केला जात नाही.6. समाज सुधारणा ,सामाजिक कल्याण व सामाजिक परिवर्तन हे सामाजिक न्यायासाठीच केले जातात.

7. मूलभूत अधिकार ,मार्गदर्शक तत्वे, सामाजिक कायदे सामाजिक धोरण ,सामाजिक नियोजन आणि संविधानाची निर्मिती ही सामाजिक न्यायाची साधने मानली जातात.

8.भारतात आरक्षण धोरणाला सामाजिक न्यायाचा आधार मानण्यात आलेला आहे..

**भारतीय राज्यघटना आणि सामाजिक न्याय**

सामाजिक न्यायासाठी भारतीय राज्यघटनेची निर्मिती करण्यात आलेली आहे . राज्यघटनेत त्यासाठी अनेक तरतुदी करण्यात आलेल्या आहेत .त्यामध्ये मूलभूत अधिकार ,मार्गदर्शक तत्त्वे ,सामाजिक धोरण, सामाजिक कायदे आणि सामाजिक नियोजन इत्यादी.

**मूलभूत अधिकार**

राज्यघटनेतील तिसऱ्या प्रकरणात भारतीय नागरिकांना काही मूलभूत अधिकार देण्यात आलेले आहेत. निरनिराळ्या कलमात याची तरतूद करण्यात आलेली आहे.

1. **कलम 14 नुसार--** सर्व नागरिक कायद्यासमोर समान असतील व त्यांना समान संरक्षण ही दिले जाईल.

2. **कलम 15 नुसार --** धर्म,जात, वंश , लिंग आणि जन्माच्या आधारे भेदाभेद न करणे.

3. **कलम 16 नुसार--** सर्व नागरिकांना प्रशासनात समान संधी दिली जाईल. पात्रतेनुसार निरनिराळ्या पदावर नेमणूका केल्या जातात.

4. **कलम 17 नुसार --** अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्यात आले असून कुणालाही अस्पृश्यता पाळता येणार नाही.

5. **कलम २५ नुसार --** कोणत्याही प्रकारचे शोषण करता येणार नाही किंवा मोबदला न देता काम करून घेता येणार नाही . मुलभूत अधिकार प्रदान करून सामाजिक न्यायात निर्माण होणारे अडथळे दूर करण्यात आले आहेत.

**मार्गदर्शक तत्वे**

राज्यघटनेतील प्रकरण चार मध्ये मार्गदर्शक किंवा नीती निर्देशक तत्वांचा उल्लेख करण्यात आला आहे .यातील काही प्रमुख तत्वे नागरीकांना सामाजिक न्याय देण्यासाठी असलेले दिसून येतात. ते खालील प्रमाणे आहेत.

1. **कलम 41 नुसार-** कोणत्याही नागरिकांना काम मागण्याचा ,शिक्षण घेण्याचा आणि मदत मागण्याचा अधिकार आहे.

2. **कलम 42 नुसार** -कामगारांना काम करण्या योग्य परिस्थिती सरकारने निर्माण करावी.

3. **कलम 44 नुसार** --सर्वांसाठी समान नागरी कायदा संमत केला जावा.

4. **कलम 45 नुसार--** 14 वर्षाखालील सर्व मुला -मुलींना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाची व्यवस्था केली जावी.

5.**कलम 47 नुसार** -जनतेचे जीवनमान उंचावण्याचा सरकारने प्रयत्न करावा.

**सामाजिक धोरण**

सामाजिक न्यायसाठीच सरकारने निरनिराळी धोरणे संमत करावीत, असे राज्यघटनेत नमूद करण्यात आले आहे. स्वतंत्र्यानंतर सरकारने अनेक सामाजिक धोरणांची निर्मिती केली. त्यात आरक्षणाचे धोरण , मुलांच्या कल्याणाचे धोरण, कामगार धोरण, महिला धोरण, दलित भटके व आदिवासी जमातीचे धोरण लोकसंख्या विषयक धोरण, पोषाहार , गृहनिर्माण ,शिक्षण आणि आरोग्य विषयक धोरण इत्यादी.

**सामाजिक कायदे**

समाजाची गरज, समाज कल्याण सामाजिक समस्या निर्मूलनासाठी सरकार वेळोवेळी जे कायदे करते त्यांना सामाजिक कायद्ये असे म्हणतात.सामाजिक कायद्याद्वारा समाजाची पुनर्रचना व समाजाचे परिवर्तन केले जाते .तसेच या कायद्याची अंमलबजावणी करून स्वातंत्र्य, समता आणि बंधुता न्याय या मूल्यावर आधारलेला आदर्श समाज निर्माण केला जातो. समाजात जेव्हा गुंतागुंत आणि अडथळे निर्माण होतात तेव्हा सामाजिक कायद्याची आवश्यकता निर्माण होते . समाजात परिवर्तन करणे, समाजाची पुनर्रचना करणे, हा सामाजिक कायद्याचा उद्देश असतो .या प्रकारे सामाजिक कायदात समाज सुधारणा ,सामाजिक समस्याचे निराकरण आणि सामाजीक आदर्शाच्या नियमांचे एकत्रीकरण असते.

सामाजिक कायद्यात स्त्रिया ,लहान मुले, कामगार सुरक्षितता, ग्राहक यांच्यासाठी संमत करण्यात आलेल्या अनेक कायद्यांचा समावेश केला जातो .सामाजिक कायद्यात सामाजिक व धार्मिक सुधारणा कायद्यांचा समावेश केला जातो. या कायद्याचे स्वरूप सुधारात्मक असते.भारतात समाजावर अनेक दुष्ट रूढी व वाईट परंपरांचा प्रभाव आहे . या सामाजिक प्रगतीला, व्यक्ती विकासाला

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(A)| February - 2026

अडथळा निर्माण करतात . यांना धर्माचा,धर्म ग्रंथांचा आधार आहे. परंतु या रूढीतून समाजात अनेक दोष निर्माण झाले. दोषांच्या निर्मूलनासाठी सामाजिक कायदे संमत करण्यात आले. त्यात सती प्रथा बंदी कायदा,विवाह विषयक कायदे , अस्पृश्यता प्रतिबंधक कायदा, हुंडा प्रतिबंधक कायदा, भ्रुणहत्या प्रतिबंधक कायदा ,कामगार विषयक कायदा , अपंगांसाठी कायदा , स्त्रिया आणि मुलींच्या अनैतिक व्यापारस प्रतिबंध घालणारा कायदा इत्यादी.

**सामाजिक नियोजन**

सामाजिक नियोजनाला आर्थिक नियोजनाचा एक महत्त्वपूर्ण भाग मानून भारतात पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून सामाजिक न्यायासाठी अनेक कार्यक्रमाची निर्मिती करून त्यांची अंमलबजावणी करण्यात येते व विषमतेची शिकार झालेल्या समूहांना समाजाच्या मूळ प्रवाहात आणण्याचाही सातत्याने प्रयत्न केला जात आहे.

भारतीय संविधानातच सामाजिक प्रतिष्ठा, समानता आणि न्याय यासाठी अनेक कलमे आणि तत्वे प्रदान केली आहेत. भारतातील सामाजिक लोकशाहीच्या इमारतीचे मुख्य दगड आहेत .बनवलेले कायदे भारतीय संविधानाने स्थापित केलेल्या तत्त्वानुसार असतात आणि असलेच पाहिजेत . तसेच समाजाच्या सर्व घटकांच्या हिताचे देखील असले पाहिजेत .कलम 41 लोकांच्या काम करण्याच्या अधिकाराला बळकटी देते ज्यामुळे कोणत्याही व्यक्तीला त्याच्या रोजच्या जेवणापासून वंचित ठेवले जाणार नाही. त्यात अपंगत्व , वृद्धापकाळ, आजार इत्यादी प्रकरणांमध्ये शिक्षणाचा अधिकार आणि सार्वजनिक मदतीचा अधिकार देखील बळकट केला आहे.

**संदर्भ सूची**

1. भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया तुकाराम जाधव व महेश शिरापूरकर द युनिक अकॅडमी पुणे.
2. भारतातील सामाजिक कल्याण प्रशासन डॉ.लक्ष्मण कोत्तापल्ले विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद.
3. Http://Www.Mahamtb.Com
4. Https://Marathivishwkosh.Org.
5. Http://Juriscentre.Com